imma™


# Punyanagari

## AGNEE

**Date: 16-06-2007 | Edition: Mumbai | Page: 9 | Source: Bureau | Clip size (cm): W: 27 H: 7**

**Clip: 1 of 1**


# हिंदुस्थानी रॉक संगीताची दिशा बदलणारा बॅण्ड ‘अग्नी’

मोहन, कोको आणि अरिजीत या तिघांचा नवा ‘अग्नी’ हा बॅण्ड नुकताच लाँच करण्यात आला. हा बॅण्ड हिंदुस्थानात बहुधा पहिलाच असेल. ज्यात वर्तमान संगीतकार आणि पारंपरिक कलाप्रेमी यांचे मिश्रण ऐकायला मिळेल.

या बॅण्डतर्फे ‘साधो रे’ आणि ‘कबीरा’ या गीतांत ४०० वर्षांपूर्वीचे महान संतकवी कबिराचे दोहे सामील आहेत. ‘अग्नी’ या अल्बममधील गीते थेट मनाला जाऊन भिडतात. ही गीते विचारांना उत्तेजित करून आत्मनिरीक्षण करण्यास भाग पाडतात. यातील ‘साधो रे’ हे व्हिडीओ गीत पाहतानाही हाच अनुभव येतो. एक छोटी मुलगी वडिलांपासून गर्दीत दुरावते. ती वणवण भटकते. त्या वेळी तिला मुंबई शहराची खरी ओळख होते. ‘मुर्दों का शहर’ असलेल्या मुंबईत कोणीच कोणाचा नसतो. फक्त अन्न, वस्त्र व निवारा यासाठी झगडणाऱ्या लोकांना पाहून ही बालिका रडू लागते. तिला आपण वडिलांपासून दुरावलो असल्याची जाणीव होते. हे चित्रणच इतके संवेदनशील आहे की, अखेरीस तिला वडील भेटतात तेव्हा आपल्याच जीवात जीव येतो.




‘अग्नी’ या बॅण्डमध्ये तीन संगीतकार-गायक असून तिघांचीही पद्धत वेगवेगळी आहे. कोको शास्त्रीय रॉकच्या सहाय्याने, मोहन हिंदुस्थानी पद्धतीने, तर अरिजीत जैजच्या ढंगाने गायन करतो. तिघेही वेगवेगळ्या पद्धतीने गात असले तरी सूर, नाद एकच असल्यामुळे ऐकणारा तल्लीन होतो. सोनी बीएमजीतर्फे हा अल्बम प्रदर्शित करण्यात आलेला आहे. सोनी बीएमजीचे व्यवस्थापकीय संचालक श्रीधर सुब्रह्मण्यम या अल्बमबाबत म्हणाले, ‘अग्नी’ हा बॅण्ड केवळ तीन बुद्धिमान संगीतकारांचे मिश्रण नसून तिघा व्यावसायिकांनी एकत्र येऊन केलेला अल्बम आहे. ‘अग्नी’ प्रदर्शित करताना आम्हाला आनंद होतोय. या अल्बममुळे हिंदुस्थानी रॉक संगीताची दिशाच बदलेल हे नक्की!’ या अल्बममध्ये एकूण ८ गीते असून ती सर्वांच्या सर्व संगीताचे श्रेष्ठत्व स्पष्ट करतात.